# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- २९८३/२०२२

**अपिलार्थी, श्री.संकेत चंद्रकांत हिंदुराव,**
मु.म्हारळ, पो.वरप, ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ १०३.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२,
शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे,
बी.जे.हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे (प),
जि.ठाणे ४०० ६०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी,
शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे,
बी.जे.हायस्कूल, टेंभी नाका, ठाणे (प),
जि.ठाणे ४०० ६०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १८.११.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०७.०४.२०२२ | -- | २३.०६.२०२२ | २९.०७.२०२२ |

अपिलार्थी यांनी दि. १४.१०.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *"No response received within ३० days of submission of form / "* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १८.११.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"बी.के.बिर्ला पब्लीक स्कूल, कल्याण यांचे सदंर्भात शाळेच्या शुल्क वाढीबाबत केलेल्या चौकशीच्या अहवाल मिळणेबाबत.*

*१) शिक्षणाधिकारी यांचे पत्र जा.क्र.ठा.जि.प./शिक्षण/माध्य./२०२१/९७२३ दि.०३.०६.२०२१ अन्वये आपण केलेल्या चौकशीचा अहवाल मिळणेबाबत.*

*२) सदर केलेल्या चौकशी अहवाल आपल्या कार्यालयातून पुढील कारवाईसाठी गेलेल्या कार्यालयाचे विवरण व आपण केलेल्या कारवाईचा तपशिल मिळणेबाबत."*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवदन केले की, त्यांना माहिती मिळाली नाही.

उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत. त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे यांनी त्यांच्या दि.२७.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना असे कळविले आहे की, आपण शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद ठाणे या कार्यालयाकडून बि.के.बिर्ला पब्लिक स्कूल कल्याण यांचे संदर्भात शुल्क वाढीबाबत केलेल्या चौकशीचा अहवाल मिळणेबाबत अर्ज केला आहे. सदर अहवाल कार्यालयात आढळ होत नाही. सबब आपला माहिती अधिकार अर्ज या कार्यालयाच्या स्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०७.०४.२०२२ रोजीच्या अर्जानुसार ज्या चौकशी अहवालाची मागणी केली होती. तो चौकशी अहवाल शिक्षण विभागाच्या कार्यालयात आढळून येत नाही असे कळविले आहे. अशी जर वस्तुस्थिती असेल, तर तो अहवाल आढळ न होण्यामागची कारणे काय आहेत हे देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविणे आवश्यक होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरामध्ये अहवाल आढळून होत नसल्याबाबतचे कारण नमूद नसल्याने, सदरचे उत्तर अपूर्ण आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.२७.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना कळविल्यानुसार, चौकशी अहवाल शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे या कार्यालयात आढळून येत नसल्याबाबतची कारणे व त्याबाबतचा अहवाल आयोगासमोर पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.२७.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना कळविल्यानुसार, चौकशी अहवाल शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे या कार्यालयात आढळून येत नसल्याबाबतची कारणे व त्याबाबतचा अहवाल आयोगासमोर पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावीत.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१८.०२.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ नोव्हेंबर, २०२५ .

## सुनावणी दिनांक १८.०२.२०२६ ( In Continuation of order dt. १७.११.२०२५)

## विवेचन

उपरोक्त दि.१८.११.२०२५ रोजीच्या आदेशानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांना चौकशी अहवाल शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे या कार्यालयात आढळून येत नसल्याबाबतची कारणे व त्याबाबतचा अहवाल आयोगासमोर सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १८.०२.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.देविदास महाजन, शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचे प्रतिनिधी श्री.प्रशांत भेसले, वरिष्ठ लिपिक तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय राऊत, अधीक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद ठाणे उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी दि.१८.११.२०२५ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांना चौकशी अहवाल शिक्षण विभागात आढळून येत नसल्याबाबतची कारणे अपिलार्थी यांना कळविणेबाबतचे आदेश होते. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना सदरची माहिती विनामुल्य पुरवून त्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगाच्या दि.१८.११.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे माहिती ०८ दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी व त्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०४.०३.२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता घेण्यात येईल.

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ फेब्रुवारी, २०२६ .